# <u>प्रेसनोट</u>

**विषय :- थर्ड आय सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रकल्पाकरिता लोकसहभागातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत...**

...

दि. २७/०२/२०१९ रोजी सायंकाळी १६.०० वा. हिरकणी हॉल, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर येथे थर्ड आय सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रकल्पांतर्गत लोकसहभागातुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरातील विविध व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी / प्रतिनिधी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

वरील बैठकीमध्ये उपस्थित विविध व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी / प्रतिनिधी यांना कायदा व सुव्यवस्था परिस्थीती हाताळणे व गुन्हे प्रकटीकरणासाठी सी.सी.टी.व्ही. चे महत्व विषद करुन संपुर्ण शहरामध्ये सीसीटीव्हीचे व्यापक जाळे निर्माण करण्याकरीता खालील मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात आले.

१) उपस्थित व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी / प्रतिनिधी यांनी त्यांचे संघटनांचे सदस्यांना सीसीटीव्ही सर्व्हेलन्सचे महत्व विषद करुन त्यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरीता प्रोत्साहीत करावे.

२) सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जीओ टॅगिंग करण्यासाठी माहिती संकलीत करण्याकरीता ज्यावेळी पोलीस स्टेशनकडील अधिकारी / कर्मचारी येतील त्यावेळी त्यांना सहकार्य करुन योग्य ती माहिती उपलब्ध करणेबाबत आपले संघटनेमार्फत कळविण्यात यावे.

३) व्यावसायिकांना गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक व समाजकंटक नेहमी त्रास देत असतात. अशा गुन्हेगार व समाजकंटकाना सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे निष्पन्न करणे व त्यांचेविरुध्द ठोस कारवाई करणे पोलीस दलाला साईस्कर होईल. त्याचप्रमाणे त्यांचे गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासही मदत होईल.

४) वाहतुक कोंडीची समस्या निर्माण झाल्यास या प्रकल्पामुळे पोलीस नियंत्रण कक्ष येथे माहिती उपलब्ध झाल्यास तात्काळ कार्यवाही करुन वाहतुकीचे नियोजन करण्यास मदत होईल.

५) व्यापारी बांधवांनी त्यांना होणारा विविध माथाडी संघटनांकडुन होत असलेल्या त्रासाचा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे यांनी पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्था चांगली राखण्यासाठी पोलीस प्रशासनातर्फे आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच तातडीचेवेळी संपर्क साधण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्षाकडील वॉटस्‌ॲप क्र. ८९७५२८३१००

तसेच अपर पोलीस आयुक्त, गुन्हे यांचा मोबाईल क्र. ८३९०११८२३१ व पोलीस उप-आयुक्त, गुन्हे यांचा मोबाईल क्र. ९८२३१६७१५४ उपलब्ध करवुन देण्यात आले.

बैठकीकरीता अपर पोलीस आयुक्त गुन्हे, पोलीस उप-आयुक्त यांचेसह पोलीस निरीक्षक एमओबी, तांत्रिक विश्लेषण विभाग व विशेष शाखा असे तसेच पुणे शहरातील विविध व्यावसायिक संघटनांचे एकुण ६२ पदाधिकारी / प्रतिनिधी उपस्थित होते.

1/3/19

पोलीस निरीक्षक
तांत्रिक विश्लेषण विभाग
गुन्हे शाखा पुणे शहर